# महाराष्ट्र शासन

## जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सातारा

(नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला , एस. टी. स्टॅंड जवळ, सातारा)

दूरध्वनी क्रमांक (०२१६२) २३९९३८

ईमेल-:satararojgar@gmail.com संकेतस्थळ-:www.mahaswayam.gov.in


जा. क्र. :- जिकौविरोवउमाकेंसा / अमुअभ्या/३८८-९१/२०२५-२६ दिनांक :-२३ .०२.२०२६

प्रति,
मा.प्राचार्य,
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
कोरेगाव व औंध

विषय :- दिनांक २७.०२.२०२६ रोजी होणा-या पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याबाबत.

संदर्भ :- १. वरिष्ठ कार्यालयामार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना

२. दिनांक ५ फेब्रु २०२६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. मंत्री महोदय, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या विशेष कार्य अधिकारी यांनी दिलेल्या सूचना.

३.मा. जिल्हाधिकारी सातारा यांनी रोजगार मेळावा करिता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचा सहभाग वाढविण्याकरिता दिलेल्या सूचना.

महोदय,

उपरोक्त संदर्भाकित विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सातारा यांच्या विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा **शुक्रवार, २७.०२.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता दर्पण एज्युकेशन सोसायटी कोरेगाव, डि. पी. भोसले कॉलेज शेजारी सुभाषनगर ता. कोरेगाव जि. सातारा** येथे आयोजित करण्यात आला आहे. सदरहू मेळाव्यामध्ये १२०० पेक्षा अधिक रिक्त पदे असून त्यापैकी अंदाजे ८०० पदे ही ITI ट्रेडच्या व तांत्रिक पदवी धारक विदयार्थ्यासाठी आहेत तसेच ४०० पदे अतांत्रिक तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारकांसाठी आहेत. तरी आपण आपल्या संस्थेतून पास झालेल्या सर्व उमेदवारांना अवगत करण्यासाठी सोबत जोडलेले हॅन्डबील आपल्या संस्थेच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावे

तसेच आपल्या संस्थेमध्ये सद्यस्थितीमध्ये चालू असलेल्या अल्पमुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम या योजनेतून प्रशिक्षण घेत असलेले व प्रशिक्षण पूर्ण झालेले उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आपल्या स्तरावर माहिती द्यावी, व नियोजित ठिकाणी वेळेत उपस्थित राहतील हे पाहावे.

(सुनिल पवार)
सहायक आयुक्त
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
सातारा

प्रत माहितीस्तव

१. मा. उप आयुक्त, कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय, पुणे
२. मा. सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे
३. मा. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, सातारा.